# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### केंद्र शासनाच्या बेसिक सर्व्हिसेस फॉर अर्बन पुअर (बीएसयूपी) अंतर्गत मिरा - भाईदर शहरातील जनता नगर, कासे चर्च झोपडपट्टीबाबत

**(१) ९८२७ (०७-०४-२०१५). श्री. रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या बेसिक सर्व्हिसेस फॉर अर्बन पुअर (बीएसयूपी) अंतर्गत मिरा - भाईदर (जि.ठाणे) शहरातील जनता नगर, कासे चर्च झोपडपट्टीतील ४१६३ लोकांसाठी बांधण्यात आलेल्या व येत असलेल्या इमारतीच्या बांधकामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार तसेच झोपडपट्टी धारकांच्या यादीत फेरफार करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, संबंधितावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०४-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही .
सदर प्रकल्पासाठी पॅकेजनिहाय ठेकेदार नियुक्त केले असून सदर ठेकेदारांना (Turnkey) ठोक पध्दतीने कंत्राट देण्यात आले आहे. सदर बांधकामाचा दर्जा तपासण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती करण्यात आली असून वेळोवेळी बांधकामाचा दर्जा तपासण्यात येत आहे.

प्रकल्पातील लाभार्थ्यांची पात्रता त्यांनी सादर केलेले पुरावे व प्रत्यक्षात अस्तित्वात असलेल्या झोपडीच्या सर्वेक्षणाद्वारे लाभार्थ्यांची निवड करुन त्यांना पात्र ठरविण्यात आले आहे. तसेच लाभार्थ्यांच्या पात्रतेसंदर्भात प्राप्त तक्रारींचा निपटारा करण्यासाठी महानगरपालिकेने बीएसयुपी तक्रार निवारण समिती स्थापन केली आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

**ओपन एक्सेस पध्दतीचा (मुक्तदार) वापर करुन ४५०० दशलक्ष युनिट वीजेची गरज असणारे सुमारे ३२८ वीज ग्राहक महावितरण मधून बाहेर पडल्याने छोट्या ग्राहकांना महावितरण कडून मिळणारी सबसिडी बंद करण्यात आल्याबाबत**

**(२) ९८३३ (०४-०४-२०१५). श्री. रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओपन एक्सेस पध्दतीचा (मुक्तदार) वापर करुन ४५०० दशलक्ष युनिट वीजेची गरज असणारे सुमारे ३२८ वीज ग्राहक महावितरण मधून बाहेर पडल्याने छोट्या ग्राहकांना महावितरण कडून मिळणारी सबसिडी बंद करण्यात आली एवढेच नाहीत मोठे ग्राहक बाहेर पडल्याने होणार रु. १८६० कोटीची वसुलीही करण्याचा प्रस्ताव वीज नियामक आयोगाकडे महावितरणाने दाखल केल्यानुसार दिनांक १ एप्रिल, २०१५ पासून ही वसुली करण्यात येणार आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार वीज ग्राहकांवर पडणा-या बोज्याचे स्वरुप काय आहे तसेच छोटा वीज ग्राहक व कृषि पंपावर वाढीव भार पडू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-०६-२०१५) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी कातकरी मागासवर्गीय घटकांना वाटप करण्यात येणारे गॅस सिलेंडर न मिळाल्याबाबत**

**(३) ९८९५ (०९-०४-२०१५). श्री. सुनिल राऊत (विक्रोळी), श्री. शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री. प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि. ठाणे) तालुक्यात सन २०१० पासून राज्य व केंद्र शासनाच्या १०० टक्के अनुदानात आदिवासी घटकांना स्वयंपाकाचे गॅस वितरण करण्याची योजना सुरु आहे, हे खरे हे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा लाभ हॉटेल, धाबे, बिगर आदिवासी यांना राज्य सहकारी आदिवासी विकास मंडळाच्या शहापूर उपप्रादेशिक कार्यालयातील अधिका-यांच्या संगनमताने मिळत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यात गैरव्यवहार सुरु असून यांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०३-०६-२०१५) :** (१) होय. राज्यातील दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना घरगुती गॅस युनिट पुरविण्याची योजना सन २००६-०७ पासून सुरू करण्यात आली आहे.
(२), (३), (४) व (५) अशा प्रकारची तक्रार महामंडळ स्तरावर प्राप्त झालेली नाही. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील महिला बचत गटाच्या उत्पादनांची विक्रि होत नसल्याने अनेक महिला बचत गट बंद पडण्याच्या मार्गावर असल्याबाबत**

**(४) ९९२२ (०७-०४-२०१५). श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महिला बचत गटाच्या उत्पादनांची विक्रि होत नसल्याने अनेक महिला बचत गट बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिला बचत गटाच्या उत्पादीत मालांची विक्रि होण्यासाठी मोबाईल विक्रि केंद्र सुरु करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, ही योजना राबविण्यासाठी किती वाहने उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,
(४) अद्यापी याबाबत कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) (३) शहरी व ग्रामीण भागातील बचत गटातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी महिला उद्योगवृध्दीसाठी यंत्रसामुग्री सहाय्य प्रकल्प योजनेंतर्गत मोबाईल व्हॅन योजना प्रायोगिक तत्वावर मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर व अमरावती या ९ जिल्ह्यामध्ये राबविण्यास मा.मंत्रीमंडळाने मान्यता दिली असून सदर योजना सन २०१५-१६ पासून राबविण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयातील सायगाव (ता.चाळीसगाव), ब्राम्हणे व आंबे जुवार्डी (ता.एरंडोल), वडगाव नाकाबंदी (ता.भडगांव) इत्यादी गावातील नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामांबाबत**

**(५) १००१४ (०७-०४-२०१५). श्री. गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयातील सायगाव (ता.चाळीसगाव), ब्राम्हणे व आंबे जुवार्डी (ता.एरंडोल), वडगाव नाकाबंदी (ता.भडगांव) इत्यादी गावांतील राष्ट्रीय पेयजल ग्रामीण योजनेअंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेस मंजूरी मिळाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनांसाठी किती खर्च अपेक्षित आहे व उक्त कामास प्रत्यक्षात केव्हा

सुरूवात होणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१५-०६-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमा अंतर्गत मंजूर असलेल्या (१) सायगाव (चाळीसगाव), पाणी पुरवठा योजनेस रु.१,९७,१९,९१०/- (२) एरंडोल तालुक्यातील ब्राम्हणे पाणी पुरवठा योजनेस ६०,४९,२२२/- (३) भडगांव तालुक्यातील आंबे जुवार्डी पाणी पुरवठा योजनेस रु.७१,३६,१४५/- व वडगांव नालबंदी पाणी पुरवठा योजनेस रु.७५,५८,७६९/- इतका अंदाजपत्रकानुसार खर्च अपेक्षित आहे.

योजनेची कामे ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समिती मार्फत ई-निविदा प्रक्रीया पूर्ण करुन कामे सुरु करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील मांजरा नदीवर तेलंगणा व महाराष्ट्र**
**या दोन राज्याच्या सयुक्त चेकडॅम बाबत**

**(६) १००७७ (०७-०४-२०१५). श्री. सुभाष साबने (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील येसगी ता.बिलोली येथील मांजरा नदीवर वरच्या ठिकाणी महाराष्ट्र व तेलंगणा राज्याने संयूक्त चेकडॅम उभारण्यासंबधीचा प्रस्ताव मा.जलसंपदामंत्री यांनी महाराष्ट्र शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चेकडॅम च्या प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतलेला आहे वा घेणार आहे,

(३) अद्यापी निर्णय झाला नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (०१-०६-२०१५) :** (१) तेलंगणा राज्याचे पाटबंधारे मंत्री यांनी त्यांचे इंग्रजी पत्र क्र. Do.Lr.No. ५७/M (Irrgn, Mktg &; LA)/ २०१४ Dated २१.७.२०१४ अन्वये मांजरा नदीवर हुमनापूर शिवारा, कोटागीरी (एम) निजामाबाद जिल्हयात चेकडॅम प्रस्तावित करण्याबाबत, तसेच सदरील प्रकल्प आंतरराज्य असल्याने चेकडॅम बांधण्यासाठी परवानगी देण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे मंत्री महोदयांना विनंती केली आहे.

(२) सदरील चेकडॅम संबंधी योजनेचे सर्व्हेक्षण आराखडे अद्याप तयार नाहीत. तसेस सद्यःस्थितीत या योजने बाबत ठोस प्रस्ताव नसल्याचे तेलंगणा राज्याचे मुख्य अभियंता यांनी अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना कळविले आहे. तसेस सद्यःस्थितीत महाराष्ट्र शासनाच्या बृहत आराखड्यात या योजनेसाठी पाणी उपलब्ध नसल्यामुळे सदरील ठिकाणी कोणताही बंधरा (चेक डॅम) घेण्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येसगी उपसा (ता.बिलोली, जि.नांदेड) जलसिंचन योजनांच्या मंजूरी बाबत**

**(७) १००७८ (०७-०४-२०१५). श्री. सुभाष साबने (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येसगी (ता.बिलोली, जि.नांदेड) उपसा जलसिंचन योजना मंजूर करण्यासंबंधी लोकप्रतिधींनी दि. १३/१/२०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी कली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपसा जलसिंचन योजना मंजूर करण्याचा दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) अद्यापी कार्यवाही झाली नसल्यास त्याची कारणे काय आहेत,

**श्री. गिरीष महाजन (०१-०६-२०१५) :** (१) होय, मागणी केली आहे.

(२) सध्य:स्थितीत या योजनेसाठी पाणी उपलब्ध नसल्यामुळे सदरील ठिकाणी उपसा जलसिंचन योजना हाती घेणेबाबत कोणताही प्रस्ताव जलसंपदा विभागाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटण तालुक्यातील वांग मराठवाडी धरणप्रकल्पातील**
**धरणग्रस्तांचे तातडीने पुनर्वसन करणेबाबत**

**(८) १०२२० (०९-०४-२०१५). श्री. शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटणा (जि.सातारा) तालुक्यात सन १९९७ मध्ये प्रारंभ झालेल्या वांग मराठवाडी या धरणाचे काम ४० टक्के पुर्ण झाले असून सदरचे धरणाचे काम गत १७ वर्षापासून बंद अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वांग मराठवाडी या धरणप्रकल्पातंर्गत मेंढ, खालचे घोटील, मरकांचन ही गांव पुर्णतः तर मराठवाडी, जाधववाडी, वरचे घोटील, जिंती, निगडे व कसणी ही अशंतः बाधीत गांवे होत असून या गावांमध्ये सुमारे २००० चे वर कुटूंब असून त्यांचे पुर्नवसन अद्यापही झाले नाही या कुटूंबांच्या पुनर्वसनची जबाबदारी ही राज्य शासनावर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने या धरणग्रस्तांच्या पुर्नवसनाबाबत कोणती उपाययोजना केली आहे,

(४) नसल्यास, सदरचे वांग मराठवाडी धरणाचे काम पुर्ण करणेकरीता तसेच बाधीत गावांचे पुर्नवसन करणेकरीता राज्य शासन कोणता निर्णय घेणार आहे अद्याप घेतला नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :** (१) नाही.

सन १९९७ मध्ये सुरु झालेले धरणाचे काम ८० टक्के पुर्ण झालेले आहे. सन २०११ पासून धरणाचे काम प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे बंद आहे.

(२) होय.

मौजे-रेठरेकरवाडी , मेंढ, घोटील व उमरकांचन अशी ४ गावे पूर्णत: तर मौजे मराठवाडी, जाधववाडी, कसनी, निगडे व जिंती अशी ५ गावे अंशत: बाधित होत असून एकूण १९३९ बाधित खातेदार आहेत. प्रचलित शासन नियम व कार्यपध्दतीनुसार सदरील खातेदारांचे पुनर्वसन प्रगतीपथावर आहे.

(३) शासनाच्या प्रचलित नियम व कार्यपध्दतीनुसार पुनर्वसनाबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती शहराच्या पश्चिम बाजुने अकोला वरुन जाणा-या महानगर पालिकाच्या विकास योजनेतील वळण रस्त्यांचे काम भुसंपादनाअभावी रखडल्याबाबत

**(९) १०२७८ (०७-०४-२०१५). डॉ. सुनिल देशमुख (अमरावती), डॉ. पंकज भोयर (वर्धा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहराच्या पश्चिम बाजुने अकोला वरुन जाणाऱ्या महानगरपालिकाच्या विकास योजनेतील वळण रस्त्यांचे काम पुर्ण करण्यासाठी १०.९९ हे. आर. वन विभागाच्या भुसंपादनाची सद्यःस्थिती काय आहे,

(२) असल्यास, या भुसंपादना अभावी या रस्त्याचे काम पूर्ण न झालेल्या शहराबाहेरुन जाणाऱ्या या रस्त्यावरील वाहतूक बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन जमीनाच्या व्यतिरिक्त इतर भुसंपादनाची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :** (१) सदर रस्त्यांच्या बांधकामास वन विभागाची परवानगी प्राप्त झाली असून महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र राज्य विकास महामंडळास बांधकाम करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(२) होय.

(३) व (४) मौजा बडनेरा सर्व्हे नं. २८०, ३४० व ३४९ (चमन नगर) येथील १.२३ हे आर जागा संपादनाची कार्यवाही जिल्हा प्रशासनाकडे सुरु आहे सदर भूसंपादन प्रकरणी अंतिम निवाडा दिनांक ३१.५.२०११ ला प्रसिध्द करण्यात आलेला आहे. निवाडा रक्कम रु. ३३.९६ लक्ष ही शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीमधून वळती करण्याबाबत भूसंपादन अधिकारी यांना दिनांक १६.८.२०११ अन्वये कळविण्यात आले आहे. अद्याप जागेच्या ताबा मिळालेला नाही.

---

**अमरावती महानगरपालिकेद्वारे महिलाकरीता फायबर टॉयलेट खरेदी करण्याबाबत**

**(१०) १०२८६ (०७-०४-२०१५). डॉ. सुनिल देशमुख (अमरावती), डॉ. पंकज भोयर (वर्धा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिकेद्वारे महिलांकरीता फायबर टॉयलेट खरेदी करण्यात येवून या टायलेट खरेदी व्यवहार संशयास्पद असल्यामुळे मोठ्या प्रमाणात तक्रारी करण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टॉयलेटमध्ये पाणी व्यवस्था तसेच पाणी वाहून जाण्यासाठी नालीचे बांधकाम केले नसल्याची बाब माहे जून, २०१३ चे दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दोषी कंत्राटदार विरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :** (१) होय.

(२) महानगरपालिकेमार्फत प्रस्तुत बाबी आणि तक्रारी मधील इतर मुद्दयांची चौकशी सुरु आहे.

(३) महानगरपालिकेने सदर प्रकरणाचे चौकशी आदेश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील नायगाव ते भाईंदर आणि मीरारोड ते दहिसर खाडीवर रेल्वे लाईन लगत वाहनांच्या रहदारीसाठी पुल बांधण्याबाबत**

**(११) १०३४८ (०६-०४-२०१५). श्री. नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील नायगाव ते भाईंदर आणि मीरारोड ते दहिसर खाडीवर रेल्वे लाईन लगत वाहनांच्या रहदारीसाठी पुल बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावास शासनाकडून मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पुलासाठी शासनाकडून किती निधी मंजूर करण्यात आला आहे,

(४) तसेच, या कामाची सद्यस्थिती काय आहे व किती कालावधीत हा पुल पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१), (२) व (३) नायगाव ते भाईंदर खाडीवर रेल्वे लाईन लगत पूल बांधण्याचा प्रज्ञतव मुंबे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मान्य केला असून मिरारोड ते दहिसर खाडीपुलाचा प्रस्ताव विचाराधीन नाही. नायगांव ते भाईंदर खाडीवर रेल्वे लाईन लगत पूल बांधण्यासाठी प्राधिकरणाने रु.८७५.५७ कोटी रुपये निधी मंजूर केला आहे.

(४) सद्यस्थिती प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्यात आली असून अंदाजपत्रके व निविदापूर्व प्रक्रियेचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रगतिपथावर आहे.

---

**औरंगाबाद येथील अजंठा गुंफांच्या संवर्धनासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(१२) १०३९९ (०७-०४-२०१५). श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील अजंठा गुंफांची पावसामुळे दूरवस्था झाल्याने त्यांच्या संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजना करण्याकरीता योग्य ती कार्यवाही करण्यात येईल अशी ग्वाही संबंधित मंत्री महोदयांनी दिली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :** (१) नाही.
अजंठा लेण्या या राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून त्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ कार्यालय औरंगाबद यांच्या अखत्यारीत येतात. अधिक्षक पुरातत्वविद् यांनी दिलेल्या माहितीनुसार सदर लेण्यांचे संवर्धन सातत्याने केले जात असून लेण्या सुस्थितीत आहेत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सागरी गस्ती करीता खरेदी करण्यात आलेल्या ॲम्फिबीया गाडया आजतागायत वापरातच नसल्याबाबत**

**(१३) १०४७६ (०७-०४-२०१५). श्री. नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री. प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री. अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील २६/११ च्या हल्यानंतर सागरी गस्तीकरीता खरेदी करण्यात आलेल्या ॲम्फिबीया गाडया आजतागायत वापरातच नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गाड्या वापरात नसण्याबाबतची कारणे काय आहेत,
(३) उक्त प्रश्नी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

एकूण १९ ॲम्फिबीयस वाहनांपैकी १५ वाहने कार्यरत असून ४ ॲम्फिबीयस वाहने नादुरुस्त असून त्याची दुरुस्ती चालू आहे. नमूद ॲम्फिबीयस वाहनांचा वापर संबंधित पोलीस ठाण्यांमार्फत आवश्यकतेप्रमाणे करण्यात येतो.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अचलपूर मतदारसंघातील चंद्रभागा व पुर्णा मध्यम प्रकल्पाची कालवे व वितरण प्रणालीचे कामांमुळे सिंचन क्षमतेत वाढ झाली असल्याबाबत**

**(१४) १०४९४ (०७-०४-२०१५). श्री. बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर मतदारसंघातील चंद्रभागा व पुर्णा मध्यम प्रकल्पाची कालवे व वितरण प्रणालीच्या कामांमुळे सिंचन क्षमतेत वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदय:स्थितीत वितरीका व लघु कालवे नादुरुस्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याचा सिंचन क्षमतेवर परिणाम होत आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याची विविक्षित कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :** (१) होय.

(२), (३), व (४) कालव्यामध्ये गाळ साचणे, कालव्यामध्ये झाडे झुडपे वाढणे, इ. कारणामुळे सिंचनावर काही अंशी परिणाम होत आहे.

(५) १३ व्या वित्त आयोगामार्फत प्राप्त निधी व यांत्रिकी विभागाचे मशिनरी मार्फत कालवा दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत.

---

**विदर्भात दुष्काळ घोषित करण्याच्या मागणीसाठी अमरावती येथे शेतकऱ्यांचा काढण्यात आलेला मोर्चा**

**(१५) १०५०६ (८-३-२०१५). श्री. बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात दुष्काळ घोषित करण्याच्या मागणीसाठी अमरावती येथे प्रहार व शेतकरी संघटना यांच्या वतीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१४ रोजी शेतक-यांच्या मोर्चा काढण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मोर्चाने दिलेल्या निवेदनातून शेतक-यांना हमीभावात वाढ व्हावी, पेरणीपासून कापणीपर्यंतची कामे मगारोहयो मधून घ्यावी या व इतर मागण्या करण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या मागण्या मान्य करण्यासंदर्भात काय कार्यवाही केली आहे ?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१-६-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) निवेदनातील विविध मागण्यांच्या अनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्यासाठी निवेदनाच्या प्रती संबंधीत कार्यालयास पाठविण्यात आल्या आहेत. या विभागाशी संबंधीत दुष्काळ/टंचाईच्या मुद्या संदर्भात सन २०१४ मधील खरीप व रब्बी हंगामातील अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेल्या अनुक्रमे २३,८११ व १,२५३ गावांमध्ये टंचाईसदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली असून तेथे विविध सोयी/सवलती लागू करण्यात आल्या आहेत. तसेच अवेळी पाऊस व गारपीटीमुळे बाधित शेत-यांना मदत व सवलती जाहीर करण्यात आलेल्या आहेत. डॉ.नरेंद्र जाधव समितीच्या अहवालातील स्विकृत शिफारशींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत संबंधीत विभागांना कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील मंत्रालयात मंत्रालाच्या सुरक्षाव्यवस्थेवर ताण पडत असल्याबाबत**

**(१६) १०५१५ (०६-०४-२०१५). श्री. बच्चू कडू (अचलपूर), डॉ. अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मंत्रालयात विविध कामांसाठी राज्यातून येणाऱ्या नागरिकांची मोठया प्रमाणावर गर्दी होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोठी गर्दी असल्यामुळे मंत्रालयाच्या सुरक्षाव्यवस्थेवर ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य व्यवस्थापन करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०१५) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) मंत्रालयात कामासाठी येणा-या नागरिकांच्या गर्दीचे व्यवस्थापन करण्याकरीता यापुर्वी नागरीकांच्या प्रवेशासाठी बंद असलेले आरसा गेट येथुन प्रवेश देण्यास सुरुवात करण्यात आलेली आहे. प्रवेश पत्रिका देण्याचे संगणकाद्वारे तसेच ऑनलाईन देण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. सुरक्षा तपासणी चौकीमध्ये सुरक्षा तपासणी यंत्रणा वाढवून सुरक्षा तपासणीसाठी अतिरिक्त मनुष्यबळ सशस्त्र विभागाकडून उपलब्ध करण्यात आले आहे.

---

## राज्यातील रुग्णालये सुधारण्यात शासकीय उदासीनतेचा फटका

**(१७) १०५४२ (०७-०४-२०१५). श्री. बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोरुग्णालयाचा कारभार सुधारण्यासाठी शासनाने ११ जणांची राज्यस्तरीय समिती नियुक्त केली असून त्यांच्या शिफारशी व अमंलबजावणी सुरु झाली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, मनोरुग्णालये उभारण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात आली आहे
(३) असल्यास, मनोरुग्णालये उभारण्यापूर्वी नियोजनात पूर्वीच्या त्रुटी वगळण्यात आल्या आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१५-०६-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) राज्यस्तरीय समितीने मराठवाडा विभागामध्ये मनोरुग्णालय सुरु करण्याबाबतचा विचार व्हावा अशी शिफारस केली असून मराठवाड्यातील जालना जिल्ह्यात मनोरुग्णालयाकरीता जागा प्राप्त करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) समितीच्या शिफारशीनुसार रुग्णालयातील नियोजनात सुधारणा करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## नगर तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतक-यांना अनुदान देण्याबाबत

**(१८) १०७०९ (०६-०४-०२०१५). श्री. शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगर तालुक्यातील अपु-या पावसामुळे २०१२-१३ मध्ये रब्बी हंगाम असमाधानकारक झाल्याने गावांची अंतिम पैसेवारी ५० टक्यापेक्षा कमी आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगर तालुक्यातील शेतकरी दुष्काळ अनुदानापासून वंचित राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनुदानापासून वंचित ठेवण्याचे कारण काय,
(४) असल्यास, सदर तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतक-यांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-०६-२०१५) :** (१) होय. सन २०१२-१३ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील एकूण ११८ गावांपैकी रब्बी गावे ११३ असून सदर सर्व ११३ गावांची अंतिम पैसेवारी ५० पैशंपेक्षा कमी आलेली आहे.

(२) सन २०१४ मधील रब्बी हंगामातील बाधित ४५,५९८ शेतक-यांना रु.२०.६७ कोटी अनुदान देयात आले असून उर्वरित बाधितांना द्यावयाच्या अनुदानाची मागणी करण्यात आली आहे. सदर अनुदान प्राप्त झाल्यानंतर वितरित करण्यात येईल.
(३), (४) व (५) निधी उपलब्धतेनुसार अनुदान देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**मोर मध्यम प्रकल्प, हिंगोणाच्या (ता.यावल जि.जळगाव) कालव्याबाबत**

**(१९) १०८५० (०७-०४-२०१५). श्री. हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोर प्रकल्प, हिंगोणा ता.यावल मध्ये पुरेसा पाणीसाठा असुनही केवळ पाटचा-यांची कामे पूर्ण न झाल्याने शेतक-यांना सिंचनास पाणी उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पाच्या पाटचा-या पूर्ण करण्यास शासनाकडून कोणती कार्यवाही होत आहे वा करण्यात येत आहे?
**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
सांगवी बोरखेडा सबमायनर, मारुळ मायनर-१, न्हावी वितरिका व उपवितरिका वरील शेतकऱ्यांचा पारंपरिक पाटचाऱ्यास व त्यासाठीच्या भू-संपादनास विरोध आहे त्यामुळे पाटचाऱ्यांची कामे झालेली नाहीत.
(२) न्हावी-मारुळ वितरिका ही बंदिस्त पाईप लाईन मधून प्रस्तावित केलेली आहे हिंगणा वितरिकेच्या उपवितरिकेच्या भू-संपादनाची प्रक्रिया प्रगतीत आहे.

---

**जळगाव जिल्हासाठी नादुरुस्त असलेल्या जलसंचयनीच्या दुरुस्ती निधीबाबत**

**(२०) १०८५४ (०७-०४-२०१५). श्री. हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयासाठी नादुरुस्त असलेल्या विविध जलसंचयनीच्या दुरुस्तीसाठी RRR (दुरुस्ती, नवनीकरण व पुनरुज्जीवन) योजनेखाली राज्य व केंद्र सरकारने मंजुर केलेला ३५ कोटी रु. चा निधी मुदतीत खर्च न केल्याने परत गेला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास याची कारणे व जबाबदार असणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०६-२०१५) :**(१), (२) व (३) होय.
RRR या केंद्र सहाय्यित योजनेंतर्गत जळगांव जिल्हयाला ल.पा. योजनांच्या दुरुस्ती कामासाठी रु. ३५.३३ कोटी इतका निधी संबंधित यंत्रणेला वितरित करण्यात आला होता. सदर आदेशामध्ये केंद्र हिस्सा प्राप्त झाल्याशिवाय वितरीत निधी खर्च न करण्याची अट नमूद करण्यात आलेली होती. त्यानुसार केंद्रिय निधी बराच काळ प्राप्त न झाल्यामुळे वितरीत करण्यात आलेला निधी शासन कोषागारात जमा करुन घेण्यात आलेला आहे.

---

**औद्योगिक प्रशिक्षण संस्थाकडून दिल्या जाणा-या प्रशिक्षण अभ्यासक्रमात नवीन अभ्यासक्रमानुसार यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२१) १०८७० (०८-०४-२०१५). श्री. योगेश टिळेकर (हडपसर), श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री. भिमराव तापकीर (खडकवासला), श्री. विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामुळे दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षण अभ्यासक्रमात बदल करण्यात आला असून त्या संबंधित यंत्रसामुग्री उपलब्ध करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नविन अभ्यासक्रमानुसार यंत्रसामुग्री उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कुमारी मातांचे पुनर्वसन करण्याची बाब**

**(२२) १०९०७ (०७-०४-२०१५). श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री. योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील कुमारी मातांचे पुनवर्सन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०६-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) कुमारी मातासाठी पुरस्कृत स्वाधार केंद्राचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित असून, त्याचे अंदाजपत्रक मिळणेकरीता मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पांढरकवडा यांना प्रस्ताव सादर केलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या हद्दीतील महिला स्वच्छतागृहाबाबत**

**(२३) १०९६९ (०७-०४-२०१५). श्री. दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील एकूण १४०९ ग्रामपंचायतीच्या हद्दीत केवळ १२९ महिला स्वच्छतागृहे उभारण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायतीच्या तुलनेत सदर स्वच्छतागृहे अतिअल्प आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायतीचा विचार करुन व महिलांची कुचंबणा होवू नये म्हणून पुरेशा प्रमाणात स्वच्छतागृहे उभारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप स्वच्छतागृहे उभारणेबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-०५-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे, जिल्ह्यातील एकूण १४०४ ग्रामपंचायतींपैकी ३९९ ठिकाणी सार्वजनकि स्वच्छतागृहे युनिट मंजूर करून ग्रामीण पुरुष व महिलांकरिता स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच या व्यतिरिक्त जिल्हयात समाजकल्याण विभाग, तेरावा वित्त आयोग, यशवंत पंचायत राज व ग्रामपंचायत स्वनिधीतून जिल्हयातील ग्रामपंचायतीमध्ये सार्वजनिक स्वच्छतागृहे सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

(२) अंशत: खरे आहे, जिल्ह्यातील ग्रामपंचायत संख्येचा विचार करता ४७% सार्वजनिक शौचालये मंजूर असून सुमारे २८% इतकी शौचालये कार्यरत आहेत

(३) ग्रामपंचायतीचा विचार करून व महिलांची कुचंबणा होवू नये म्हणून जि.प. पुणे यांनी विशेष उपक्रम हाती घेतला असून जि.प.च्या निधीतून सन २०१५-१६ मध्ये ग्रामीण महिला तसेच पुरुषांकरिता स्वच्छतागृहे बांधकामासाठी रक्कम रु. १००.०० लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे गल्ले बोरगाव येथे मका संशोधन केंद्र स्थापन होणेबाबत**

**(२४) १०९७८ (०४-०४-२०१५). श्री. प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठ परभणी अंतर्गत औरंगाबादऐवजी मौजे गल्ले बोरगाव (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद ) येथे मका संशोधन केंद्र स्थापन करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्रव्यवहार केला होता व संदर्भात कृषी,पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय मत्स्यव्यवसायाने मृ.कृ.वि.१२१३/प्र.क्र.१०१/८-ए.ने. दिनांक १५ डिसेंबर, २०१४ सह इतर दिनांकासह पत्र करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मका संशोधन केंद्राला अद्यापपर्यंत मंजुरी देण्यात शासनाकडून दिरंगाई होत असून शेतक-यांना न्याय देण्याच्या दृष्टीने शासन निर्णय घेणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०६-२०१५) :** (१) होय.

(२) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत मौजे गल्ले बोरगांव, ता.खुलताबाद येथे मका संशोधन केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी फेरसादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील वाकडी येथे दुधना नदीवर निम्न दुधना प्रकल्पाच्या डाव्या कालव्याबाबत**

**(२५) ११०१५ (०७-०४-२०१५). डॉ. राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील वाकडी येथे दुधना नदीवर निम्न दुधना प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली असून या डाव्या कालव्याचे बांधकाम अंत्यत निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे कालव्याला मोठे भगदाड पडले असून गतवर्षीच्या अतिवृष्टीमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या कालव्यात सोडण्यात आलेले लाखो लिटर पाण्याचा अपव्यव होऊन कालवा परिसरातील शेतक-यांच्या शेतात घूसून मोठे नुकसान होण्याची शक्यता असल्यामुळे निम्न दुधना प्रकल्पाच्या डाव्या कालव्याची दुरुस्ती करण्याची मागणी कुपटा येथील गोपिनाथ सोळंके यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांचेकडे केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी / पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार सदर कालव्याच्या दुरुस्तीबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :**(१) कालव्याच्या काही भागात झाडे-झुडपे बाभळी वाढल्या होत्या व त्यामुळे कालव्याची काही प्रमाणात तुटफुट झाली होती.

(२) जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदना विषयी या विभागास ज्ञात नाही. तथापि श्री.गोपीनाथ सोळंके यांचा कालव्याच्या तुटफूटीची दुरूस्ती करण्यात यावी असा विनंती अर्ज कार्यकारी अभियंता, माजलगांव कालवा विभाग क्र.१० परभणी या विभागास प्राप्त झालेला होता.

(३) होय. अंशत: तुटफूट झाल्याचे आढळले.

(४) ही दुरूस्तीची कामे यांत्रिकी विभागामार्फत पूर्ण करण्यात आली असून, आता सदरील ठिकाणी कालवा सुस्थितीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुष्काळच्या कायमस्वरुपी निर्मुलनासाठी उस्मानाबाद जिल्ह्यात कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प पूर्ण करावयाची केलेली मागणी**

**(२६) ११०२७ (०४-०४-२०१५). श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. राहुल मोटे (परांडा), श्री. राजेश टोपे (घनसावंगी), श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळच्या कायमस्वरुपी निर्मुलनासाठी उस्मानाबाद जिल्ह्यात कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प लवकर पूर्ण करावा अशी मागणी स्थानिक प्रतिनिधीनी शासनाकडे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून काय कार्यवाही केली गेली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :**(१) होय.

(२) सदर प्रकल्पासाठी पर्यावरण मान्यतेपूर्वी कामे चालू केल्यामुळे केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाच्या दि. १२.०२.२०१४ च्या पत्रान्वये कामे संस्थगीत ठेवण्यांच्या सूचना आहेत. त्यानुसार सदर कामे सद्यःस्थितीत बंद आहेत.

प्रकल्पास पर्यावरण मान्यते बाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. मान्यता प्राप्त झाल्या नंतर प्रकल्पाची कामे सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील उद्योगासाठी लागणा-या परवानग्याची संख्या कमी करण्यासाठी ई- प्लॅटफोर्म स्थापन करण्याबाबत**

**(२७) ११०४६ (०९-०४-२०१५). श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री. राहुल मोटे (परांडा), श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. संदीप नाईक (ऐरोली), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उद्योगासाठी लागणा-या परवानग्याची संख्या कमी करण्यासाठी ई- प्लॅटफोर्म तसेच जलद परवानग्यासाठी सचिव स्तरीय समिती स्थापन केलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केलेला आहे काय,

(३) असल्यास, उक्त सादर केलेल्या अहवालातील शिफारशीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रश्न (१) मधील प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत तसेच राज्यातील समस्या सोडविणे, तसेच रोजगाराबरोबर राज्याचे उत्पन्न व उद्योगवाढीसाठी, सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुभाष देसाई (२२-०५-२०१५) :** (१) होय,

"मेक इन महाराष्ट्र" या उपक्रमांतर्गत उद्योगांसाठी लागणा-या कंपन्यांची संख्या कमी न करता राज्यातील उद्योगांना लागणारे विविध परवाने / संमती यांची संख्या व त्यासाठी लागणारा कालावधी कमी करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उप समिती स्थापन करण्यास तसेच राज्यात गुंतवणूक करणा-या उद्योगांना लागणा-या विविध परवाने / संमती जलद गतीने उपलब्ध करुन देण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागांच्या सचिवांची शक्तीप्रदान समिती गठीत करण्यास शासन निर्णय क्रमांक - मेइम-२०१४/प्र.क्र.८८/उद्योग-८ दिनांक ८/१/२०१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(२) दिनांक १५/१/२०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना उद्योगांना देण्यात येणाऱ्या मंजू-यांच्या संख्येत कपात करणे, मंजूरी प्रक्रियेसाठी लागणारा कालावधी कमी करणे, विविध योजनांचे विलीनीकरण करुन एकच सर्वंकष योजना राबविणे, प्रचलित कायदे, धोरणे, कार्यनियमावली, तपासणी यंत्रणा यासारख्या बाबींत बदल / सुधारणा करणे व त्यासाठी विहित कालमर्यादा ठरवून देण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत.

(३) सदर प्रकरणी शक्तीप्रदान समितीची बैठक घेण्याचे प्रस्तावित आहे. सदर शिफारशींच्या अनुषंगाने खालील उल्लेखनिय कार्यवाही करण्यात आली आहे -

(१)उदयोगांसाठी २०,००० चौ.मी. किंवा त्यावरील बांधकामासाठी आवश्यक असणारी पर्यावरण नाहरकत (Environment clearance) आवश्यक नाही.

(२)सन २००६ पूर्वी स्थापन झालेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) औद्योगिक क्षेत्रांसाठी असलेली जनसुनावणीची आवश्यकता रद्द करण्यात आली.

(३)कृषी क्षेत्रामध्ये बांधकामासाठी अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांकामध्ये वाढ करण्यात आली.

(४)विक्रीकर कायद्या तसेच मुंबई दुकाने आणि आस्थापना कायद्यांतर्गत (Mumbai Shops & Establishments Act) नोंदणीसाठी एकच अर्ज तयार करण्यात येत आहे.

(५)मालमत्तेच्या नोंदणीसाठी व त्यातील फेर फारांसाठी प्रक्रियेचे संगणकीकरण करण्यात आले आहे.

(६)मुंबई कुळ वहिवाट व शेत जमिन कायद्यात परवानगी घेण्याची पध्दत सुलभ करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ठिंबक सिंचनाचे अनुदान केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ७५ ते ९० टक्क्यापर्यंत वाढवणे आवश्यक असल्याबाबत**

**(२८) ११०८२ (०८-०३-२०१५). श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. राहुल मोटे (परांडा), डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (मिरज), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ठिंबक सिंचनाचे अनुदान केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ७५ ते ९० टक्क्यापर्यंत वाढवणे आवश्यक असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात शेतक-यांमध्ये मोठया प्रमाणात जागृती करून ठिंबक सिंचनाचा जास्तीत जास्त वापर वाढविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने ठिबक सिंचनाला अनुदान देण्याची योजना आखण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतक-यांमध्ये सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील ३२९ कोटीचे ठिबक अनुदानच थकल्याने या योजनेला खीळ बसल्याचे माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे ठिबक सिंचनाच्या अनुदानाबाबत रक्कम मिळविण्यासाठी पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-५-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. सन २०१३-१४ अखेर, सन २०१२-१३ मधील सूक्ष्म सिंचनाचे एकूण रु. ४१७.५६ कोटी निधीचे प्रस्ताव प्रलंबित होते. त्यापैकी सदर योजनेसाठी जिल्हा स्तरावर रु. ८५.१३ कोटी निधी उपलब्ध आहे. उर्वरीत रु. ३३२.४३ कोटी निधीपैकी, सन २०१४-१५ मध्ये पूरवणी मागणीद्वारे मंजूर तरतूदीमधून रु.२१२.४३ कोटी निधी व रु. १२०.०० कोटी निधी नाबार्डकडून ग्रामिण पायाभूत विकास निधी मालिका-२० अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(४) सन २०१२-१३ मधील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी संपूर्ण निधी उपलबध करुन दिलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पारशिवनी (जि.नागपूर) शहरापासून असलेल्या कोलिता मारा परिसराचा पर्यटनाच्यादृष्टीने विकास करणेबाबत

**(२९) ११०९४ (०७-०४-२०१५). श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारशिवनी (जि.नागपूर) शहरापासून ४० कि.मी. अंतरावर असलेल्या कोलिता मारा परिसर पर्यटनाचे आकर्षण केंद्र बनल्याने या परिसराचा पर्यटनाच्यादृष्टीने विकास करावा अशी मागणी तेथील नागरिकांनी वारंवार संबंधित विभागाकडे केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिसराचा विकास पर्यटनाच्यादृष्टीने करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०५-२०१५) :** (१) नाही.
(२) व (३) कोलितमारा हे ठिकाण पेंच व्याघ्र प्रकल्पांतर्गत येत असून पर्यटक पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या संरक्षित क्षेत्रास भेट देतात. पर्यटकांच्या वास्तव्यासाठी जुने ४ (चार) संकुल उपलब्ध वर्षात पर्यटकांना थांबण्यासाठी ५ (पाच) संकुलाची निर्मिती करण्यात आली आहे.

---

**नवेगाव(खैरी) (ता.पारशिवनी, जि.नागपूर) येथील पेंच प्रकल्पातील पाणीसाठा घटल्याबाबत**

**(३०) ११०९६ (०८-०४-२०१५). श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारशिवनी तालुक्यातील (जि.नागपूर) नवेगाव (खैरी) येथील पेंच प्रकल्पातील पाणीसाठा माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात मागील आठवड्याच्या तुलनेत २ मीटरने घटल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऐन हिवाळ्यात जलसाठा घटल्यास यंदाच्या उन्हाळ्यात तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरच्या प्रकल्पातील जलसाठा घटू नये याकरीता कोणत्या उपाययोजना केल्या आहेत तसेच पाणी टंचाई निर्माण झाल्यास कोणत्या उपाययोजना आखण्यात येणार आहेत **?**

**श्री. गिरीष महाजन (२५-०५-२०१५) :**(१) होय.
(२) नाही.

तोतलाडोह येथील विज निर्मिती नंतर नवेगाव खैरी येथील उन्नेयी बंधा-यात उपलब्ध होणारे पाणी सिंचनासाठी लागणा-या पाण्याच्या तुलनेत कमी होते त्यामुळे नवेगाव खैरी येथील जलसाठ्यामध्ये घट दिसून आली. तथापि त्यामुळे उन्हाळ्यात तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार अशी परिस्थिती नाही.
(३) नवेगाव खैरी जलाशयामध्ये सिंचनासाठी पाणी उपलब्ध होण्यासाठी त्याच्या उर्ध्व बाजूस असलेल्या तोतलाडोह धरणावरील मध्यप्रदेश राज्याच्या वीज निर्मिती मंडळ यांना विद्युत निर्मिती वाढविण्याबाबतच्या सूचना क्षेत्रिय स्तरावरुन देण्यात आल्या, व त्यानुसार त्यांनी वीज निर्मिती वाढवून सिंचनासाठी आवश्यक असलेले पाणी नवेगाव खैरी जलाशयात उपलब्ध करुन दिले.

दिनांक १५.०४.२०१५ रोजी पेंच प्रकल्पाच्या जलाशयात एकूण पाणी साठा २९६.१३८ दलघमी इतका आहे. यापुढे पेंच प्रकल्पातून सिंचनासाठी पाण्याची आवश्यकता नही. पिण्याचे पाणी व औद्योगिक वापर यांचेसाठी माहे जून, २०१५ अखेर पर्यंत एकूण ९० दलघमी इतकी आवश्यकता आहे. पेच प्रकल्पात सद्यःस्थितीत पुरेसा साठा उपलब्ध असल्यामुळे पाणी टंचाई निर्माण होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**रामटेक तालुक्यातील (जि.नागपूर) खिंडशी जलाशयाचे पाणी नवेगाव खैरी (पेंच प्रकल्प) च्या डाव्या कालव्याच्या सहायाने भंडारा जिल्ह्यातील तसेच रामटेकच्या दक्षिणकेकडील भागात शेतीला सोडण्याबाबत**

**(३१) ११०९७ (०७-०४-२०१५). श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक तालुक्यातील (जि.नागपूर) खिंडशी जलाशयाचे पाणी नवेगाव खैरी (पेंच प्रकल्प) च्या डाव्या कालव्याच्या सहायाने भंडारा जिल्ह्यातील तसेच रामटेकच्या दक्षिणकेकडील भागात शेतीला सोडण्यात यावे अशी मागणी करणारे एक निवेदन तेथील ग्रामस्थांनी दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास उपविभागीय अधिकारी, रामटेक यांना देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनाद्वारे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०५-२०१५) :** (१) खिंडसी जलाशयामधून महादुला, भंडारबोडी, शिवनी, भोंडकी या गावातील शेतक-यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्याबाबतची लोक प्रतिनिधींची निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत.

(२) व (३) पेंच प्रकल्पांच्या मंजूर द्वितीय सुप्रमा नुसार पेंच नवेगाव खैरी जलाशयातून वेगळा खिंडसी पुरक कालवा काढून त्याद्वारे खिंडसी जलाशयात साठवण करण्यात येणार आहे.

खिंडसी जलाशयातून कालवा काढून नागपूर जिल्ह्यातील रामटेक तालुक्यातील १२ व भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यातील ५ असे दोन्ही मिळून एकूण १७ गावातील एकूण २४९३ हेक्टर क्षेत्राला सिंचन अपेक्षित आहे. खिंडसी पूरक कालव्याचे काम सद्यःस्थितीत प्रगतीपथावर आहे.

---

**पेंच व्याघ्र प्रकल्प (जि.नागपूर) मानसिंगदेव अभयारण्यात वन अधिनियम सर्रास धाब्यावर बसविण्यात येत असल्याबाबत**

**(३२) ११०९९ (०७-०४-२०१५). श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेंच व्याघ्र प्रकल्प (जि.नागपूर) मानसिंगदेव अभयारण्यात वन अधिनियम सर्रास धाब्यावर बसविण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणकोणत्या नियमांची उल्लंघन करण्यात आले व यांस जबाबदार असणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रामटेक (जि.नागपूर) येथील ऐतिहासिक महत्व असलेल्या राम गढमंदिर येथे महिलांकरिता शौचालय, विश्रामगृह बांधण्याबाबत**

**(३३) ११११० (०७-०४-२०१५). श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) येथील ऐतिहासिक महत्व असलेल्या राम गढमंदिर येथे महिलांकरिता शौचालय, विश्रामगृह यासारख्या अनेक समस्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समस्यासंदर्भात अनेक वेळा लोकप्रतिनिधींनी व स्थानिकांनी संबधित विभागाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गढमंदिरावर आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :**(१) हे अंशतः खरे आहे.

(२), (३) व (४) रामटेक (जि.नागपूर) येथील ऐतिहासिक महत्त्व असलेल्या राम गढमंदिर येथे महिलांकरिता २ ठिकाणी शौचालयाची व्यवस्था आहे. तसेच भैरव दरवाज्याजवळ सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम सुरु आहे. तसेच विश्रामगृहासाठी फॉरेष्टच्या जागेवर शेड बांधण्यात आलेला आहे.

---

**देवलापार (ता.रामटेक, जि.नागपूर) परिसरातील शेतक-यांना सिंचनाची सोय उपलब्ध नसल्याबाबत**

**(३४) ११११११ (०८-०४-२०१५). श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक तालुक्यातील (जि.नागपूर) देवलापार परिसरातील भाग आदिवासी भाग असून येथील शेतक-यांना सिंचनाची कोणतीही सोय उपलब्ध नसल्याने सदरच्या भागाला सिंचनाची सोय करावी व दुष्काळग्रस्त म्हणून जाहिर करण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी तसेच लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाकडे माहे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागाला दुष्काळ भाग जाहिर करुन सिंचनाची सोय करण्याकरिता शासन कोणती कार्यवाही करीत आहे,

(३) अद्याप या संदर्भात कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०६-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

देवलापार ता.रामटेक, जि.नागपूर या परिसरातील सिंचनाकरीता प्रस्तावित सागरा लघुपाटबंधारे प्रकल्पाचे बांधकामाकरीता आवश्यक वनजमीन जलसंपदा विभागाकडे वळती करण्याबाबचे निवेदन डिसेंबर, २०१४ मध्ये प्राप्त झाले आहे.

(२) संबंधित भागास सिंचनाची सोय करण्याकरिता सदर प्रकल्पासाठी आवश्यक ६.४९८ हेक्टर्स वनजमिन मान्यतेचा प्रस्ताव वनविभागास पाठविलेला आहे. प्रस्तावाचा पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पारशिवनी (जि.नागपूर) पेंच प्रकल्पाचा उजवा कालवा कामठी तालुक्यातून गेलेल्या पाटचा-यांच्या दुरुस्तीवर कोट्यावधी रुपयांचा खर्च झाल्याबाबत**

**(३५) ११११३ (०८-०४-२०१५). श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारशिवनी (जि.नागपूर) पेंच प्रकल्पाचा उजवा कालावा कामठी तालुक्यातून गेलेल्या पाटचा-यांच्या दुरुस्तीवर कोट्यावधी रुपयांचा खर्च होऊन या कालवा व पाटचा-यांतून पाण्याची गळती होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पाण्याच्या गळतीची व निकृष्ट कामांची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) चौकशीनुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :** (१) नाही.
पेंच प्रकल्प उजव्या कालव्याच्या लाभक्षेत्रातील कामठी तालूक्यातील मुख्य कालवा वगळून वितरीका व लघु कालव्याच्या दुरुस्तीची कामे जागतिक बँक अर्थ सहाय्यीत महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत करण्यात आली आहेत. यामध्ये पाटचा-यांची दुरुस्तीची कामे करण्यात आलेली नाहीत. वितरीका व लघु वितरीकाच्या केलेल्या कामांची गुणवत्ता गुण नियंत्रण मंडळाकडून तपासणी करण्यात आली असून या मध्ये कोणत्याही मोठ्या प्रकारच्या उणिवा निदर्शनास आलेल्या नाही तसेच कालव्यातून पाण्याची गळती होत असल्याचे दिसून आले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पारशिवनी (जि.नागपूर) येथून जवळच असलेल्या बाबूळवाडा, सुनगावबोडी शिवारात पेंचचा उजवा कालवा फुटल्याबाबत**

**(३६) १११२० (०८-०४-२०१५). श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारशिवनी (जि.नागपूर) येथून जवळच असलेल्या बाबूळवाडा, सुनगावबोडी शिवारात माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास दुस-या आठवड्यात पेंचचा उजवा कालवा फुटला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा कालवा फुटण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, यांस जबाबदार असणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :** (१) होय.
दि.१३.११.२०१४ रोजी उजवा कालवा सा.क्र.७६७० मी. वर सेवापथाच्या भागाने फुटला होता.
(२) पेंच उजवा कालवा नागपूर शहर पाणी पूरवठ्याकरीता बारमाही सतत वाहत असल्याने या कालव्याची नियमित देखभाल दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यास पुरेसा कालावधी मिळत नाही. कालवा एकाच माती भरावात (मोनोझोन) आहे. कालव्याची माती भुसभुशीत आहे. तसेच खेकडे, घूस, घोरपडी इत्यादी प्राण्यांनी कालव्याच्या मातीकामात बीळ केलयाने मातीकामातून पाण्याचा झिरपा (Piping) होवून कालवा फुटत असतो. ही कालवा फुटल्याची सर्वसाधारण कारणे आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ऊसतोडणी मजूरांच्या प्रलंबित मागण्याबाबत

**(३७) १११७२ (१०-०४-२०१५). श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ऊसतोडणी मजूरांच्या प्रलंबित मागण्यांबाबत त्वरित निर्णय घ्यावा याबाबतचे निवेदन माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान मा. सहकार मंत्री यांना राज्य ऊसतोडणी वाहतूक, मुक्कादम युनियनने दिले आहे हे खरे आहे काय
(२) तसेच राज्यातील ऊस तोडणी व वाहतूक दरात वाढ करावी या मागणीसह इतर मागण्यांसाठी महाराष्ट्र ऊस तोडणी व वाहतूक संघटनेने दिनांक १ फेब्रुवारी, २०१५ रोजी कोल्हापूर येथे "कोयता बंद" आंदोलन करुन जिल्ह्यातील साखर कारखाना कार्यक्षेत्रात जाऊन ऊस तोडणी मजूरांमध्ये जागृती करण्याचे काम सुरु केले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त संघटनेच्या विविध मागण्यांचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(४) या प्रकरणी अद्यापही निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१५) :**(१) ऊस तोडणी मजूरांच्या विविध संघटनानी ऑगस्ट, २०१४ मध्ये त्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबतची निवेदने प्राप्त झाली आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) संघटनांनी ऊस तोडणीच्या दरात वाढ करणेची मागणी केली आहे. सदर प्रकरणी कार्यवाही महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाकडून होत असते.

---

**श्रीगोंदा (जि. अहमदनगर) तालुक्याला पाणीपुरवठा करणाऱ्या घोड धरणातून पाण्याची गळती सुरू असल्याबाबत**

**(३८) १११७७ (०७-०४-२०१५). श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्याला पाणीपुरवठा करणाऱ्या घोड धरणातून पाण्याची गळती सुरू असल्यामुळे तालुक्याच्या एका आवर्तनाचे पाणी वाया गेल्याची बाब डिसेंबर २०१४ मध्ये उघडकीस आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणातून होणाऱ्या गळतीबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सांगुन सुध्दा गळती रोखण्याबाबत यांनी काहीही कारवाई केली नसल्यामुळे तेथील शेतकऱ्यांना दि. ३१ डिसेंबर, २०१४ रोजी आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,घोड धरणाची होणारी पाण्याची गळती वेळीच थांबविण्यात आली असती तर शेतकऱ्यांना एका अवर्तनाचा लाभ होऊन त्यांचे आर्थिक नुकसान झाले नसते हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, या धरणातून होणारी गळती थांबविण्यासाठी शासनाने कोणती उपायायोजना केली वा करण्यात येत आहे?

**श्री. गिरीष महाजन (२५-०५-२०१५) :**(१) नाही.

(२) होय.

(३) नाही.

(४) धरणातील डावा कालवा सेवाद्वारे होणा-या गळतीसंदर्भातील देखभाल, दुरुस्तीची कामे उपलब्ध असलेल्या अनुदानातून यांत्रिकी विभागामार्फत सुरु आहेत.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील नगर-दौंड रस्त्याच्या कामाबाबत**

**(३९) १११८४ (०९-०४-२०१५). श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा तालुक्यातील (जि.अहमदनगर) नगर-दौंड रस्त्याच्या कामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,

(२) असल्यास, या रस्त्याच्या कामात आतापर्यंत किती खर्च करण्यांत आला आहे व रस्त्याचे किती काम प्रलंबित आहे,

(३) असल्यास, सदरहू रस्त्याचे काम त्वरीत पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०५-२०१५) :** (१) अहमदनगर दौंड या रस्त्याची एकूण लांबी ७१.०० कि.मी. आहे. त्यापैकी ३३.०० कि.मी. लांबीचा रस्ता खराब असून त्यापैकी ६.०० कि.मी. लांबीतील रस्त्याची दुरुस्ती झाली आहे. तसेच १३.०० कि.मी. लांबीतील दुरुस्तीकरीता रु. ७ कोटीची कामे मंजूर आहेत.

(२) सदर रस्त्याच्या कामावर आतापर्यंत रु. २.५१ कोटी इतका खर्च झाला असून रु. ७ कोटीची मंजूर कामे प्रलंबित आहेत.

(३) निधीच्या उपलब्धतेनुसार खराब लांबीमधील कामे टप्प्या-टप्प्याने हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर प्रादेशिक मंडळात**
**वर्ग २ व ३ ची पदे रिक्त असल्याबाबत**

**(४०) १११८७ (१०-०४-२०१५). श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर प्रादेशिक मंडळात वर्ग २ व ३ ची अनेक पदे रिक्त असून या पदांच्या भरती बाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्ग २ व वर्ग ३ ची पदे भरती नसल्यामुळे अनेक स्थानिक विकास कामांवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकाच अधिकाऱ्यांवर दुसऱ्या कामाचा अतिरिक्त भार असल्यामुळे कामाचा दर्जा राहण्याकरिता अधिकाऱ्यांची फार गैरसोय होत असते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास सदरहू रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१५) :**(१) नाही.

(२), (३), (४) व (५) वर्ग २ व वर्ग ३ च्या पदांची निवड प्रक्रिया पूर्ण झाली असून वर्ग-२ च्या पदांचे नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत व वर्ग ३ च्या पदांसाठी उत्तीर्ण उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी सुरु असून ती पूर्ण झाल्यानंतर नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

---

**सुजल योजनेंतर्गत १३५ लीटर मानसी प्रति दिवस पाणी पुरवठा योजना मंजूर करण्याबाबत**

**(४१) १११८८ (०७-०४-२०१५). श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून सर्व नगर पालिकांमध्ये १३५ लीटर मानसी प्रती दिवस पाणी पुरवठा योजना अस्तित्वात असेल तिथे भुयारी गटार योजना लागु करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुजल योजनेंतर्गत नगर पालिकांना ७० लीटर मानसी प्रती दिवस योजनाच मंजूर केल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या नगर पालिकांना सुजल योजनेंतर्गत ७० लीटर मानसी प्रती दिवस प्रमाणे योजना मंजूर आहे त्यांना भुयारी गटारे योजना लागु होत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सुजल योजनेंतर्गत १३५ लीटर मानसी प्रती दिवस पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात येणार आहे काय,
(५) नसल्यास, न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०५-२०१५) :**(१) होय. कैंद्र शासनाच्या सेवा दर्जा प्रमाणकानुसार (Service Level Benchmarks) ज्या शहरात भुयारी गटार योजना अस्तित्वात आहे, किंवा भुयारी गटार योजना घेण्यात येणार आहे अशा ठिकाणी दरडोई दर माणसी १३५ लिटर पाणीपुरवठा करण्यासाठी योजना आखणेबाबत मार्गदर्शक सूचना आहेत.
(२) नाही.
(३) होय.
(४) व (५) पाणीपुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील (१) पाणीपुरवठा, (२) मलनि:सारण,
(३) पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी गटारे आणि (४) घनकचरा व्यवस्थापन या चार क्षेत्रांसाठी विहीत करण्यात आलेल्या सेवादर्जा प्रमाणकानुसार पाणीपुरवठ्याचे प्रमाण दरडोई दरदिनी १३५ लीटरपर्यंत वाढविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांना कळविण्यात आले आहे.
सुजल व निर्मल योजनेस दिनांक ३१.३.२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय शासन निर्णय दिनांक २३.०१.२०१४ अन्वये घेण्यात आला आहे. त्यानंतर सदर योजनेअंतर्गत नव्याने कोणत्याही कामास मंजूरी देण्यात येऊ नये असा निर्णय घेण्यात आला आहे.

---

**विदर्भातील शिंगाडा या उत्पादनाला वाव मिळण्याकरीता हमी भाव देण्याचा प्रस्ताव**

**(४२) १११९१ (०४-०४-२०१५). श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील मासेमाऱ्यांना शिंगाडा उत्पादन हे प्रमुख व पुरक उत्पादन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकारातील उत्पादन हे बी पासुन उत्पादन नसुन याच्या वेलाचे संपूर्ण वर्षभर संगोपन केले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिंगाडा उत्पादन वाढीबाबत व त्याचे संगोपन व संशोधन करण्याचा शासनाकडे प्रस्ताव प्रलंबीत आहे काय,
(४) असल्यास, या उत्पादनाला वाव मिळण्याकरीता हमी भाव देण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे विचाराधीन आहे काय,
(५) असल्यास, शिंगाडा पिकाचे उत्पन्न वाढीकरीता पर्यायी उपाययोजना काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२५-०५-२०१५) :** (१) व (२) होय

(३) प्रस्ताव विचाराधीन आहे

(४) व (५) शिंगाडा पिकाचे उत्पन्न वाढीकरिता चंद्रपूर जिल्हयामध्ये मानव विकास योजनेअंतर्गत शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचाविण्यासाठी त्यांच्या सध्या प्रचलित पिक पध्दतीव्यतिरिक्त शिंगाडा या पिकाचे प्रयोगादाखल ५ गुठयांमध्ये प्रात्यक्षिक घेण्यात येत आहे. यामध्ये प्रत्येक तालुक्यात ३५ लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल. तसेच पाण्याची व्यवस्था उपलब्ध असलेल्या शेतकऱ्यांकडे शिंगाडयाची नर्सरी तयार करण्याचे तसेच त्याच गावात निवडलेल्या इतर लाभार्थ्यांना लागवडीसाठी बियाणे उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

---

**विदर्भातील मानव विकास निर्देशांक वाढविण्याबाबत**

**(४३) ११९९४ (०६-०४-२०१५). श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचा सरासरी मानव विकास निर्देशांक हा ०.७५२ असुन विदर्भातील नागपूर जिल्हयाचा निर्देशांक सोडल्यास बाकी सर्व जिल्हयांचा मानव विकास निर्देशांक सरासरीपेक्षा प्रचंड कमी आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील या सर्व जिल्हयाचा सरासरी मानव विकास निर्देशांक वाढविण्याकरीता या जिल्हयांतील साधनांचा (रस्ते पुल आरोगय सुविधा) अनुशेष भरून काढणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुशेष भरून काढण्याकरीता पद भरतीचा अनुशेष भरून काढणे अत्यावश्यक असुन या पदभरती मध्ये स्थानिक रहिवाशांना प्राधान्य देण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, मानव विकास निर्देशांक वाढविण्याकरीता करण्यात येणा-या उपाययोजनांबाबत विस्तृत माहिती तसेच निधीचे प्रयोजन याबाबत विस्तृत माहिती व रूपरेषा काय?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०५-२०१५) :**(१) सन २०११ साठी महाराष्ट्र राज्याचा सरासरी मानव विकास निर्देशांक ०.७५२ आहे. या निर्देशाकांशी विदर्भातील १० जिल्हयांची तुलना केल्यास मानव विकास निर्देशांकाचा सापेक्ष स्तर हा वाशिम व गडचिरोली जिल्हयांचा निम्न स्तरावर, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ,भंडारा, गोंदिया व चंद्रपूर या सहा जिल्हयांचा मध्यम स्तरावर, अकोला व वर्धा जिल्हयांचा उच्च स्तरावर आणि नागपूर जिल्हयाचा उच्चतम स्तरवर आहे. यावरुन विदर्भातील जिल्हयांचा मानव विकास निर्देशांक प्रचंड कमी नसून राज्याच्या सरासरी निर्देशांकाच्या तुलनेत थोडासा कमी आहे.

(२) मानव विकास निर्देशांक प्रामुख्याने पुढील बाबींवर काढण्यात येतो.

(१) शिक्षण (२) आरोग्य व (३) आर्थिक स्थिती

मानव विकास निर्देशांक वाढविण्याच्या दृष्टीने जिल्हयाची योजना तयार करतांना पुरेशी तरतूद करण्याबाबत सर्व जिल्हयांना सूचना देण्यात येतात. त्यानुसार सर्व जिल्हा नियोजन समित्यांनी सन २०१५ -१६ साठी आपपल्या जिल्हयाच्या वार्षिक योजना अंतिम केल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) मानव विकास कार्यक्रमांतर्गत सद्यःस्थितीत शिक्षण, आरोग्य व उत्पन्नवाढ याबाबत विविध १६ योजना राबविण्यात येत आहेत. यासाठी सन २०१५-१६ मध्ये रु.२०२.०० कोटी नियतव्यय अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील लघु उद्योग बंद पडत असल्याबाबत**

**(४४) १११९५ (०९-०४-२०१५). श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात गत तीन वार्षमध्ये एकुण १८० लघु व मोठे उद्योग बंद पडलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील बहुतांश उद्योग हे कोळसा व वीजेच्या कमी उपलब्धतेमुळे बंद पडलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हे सर्व उद्योग बंद पडल्यामुळे हजारो लोक बेरोजगार झालेले आहेत, तसेच बंद पडलेल्या उद्योगांना पुर्ववत सुरु करण्याकरीता शासन स्तरावरुन विशेष उपाययोजना राबविण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

मागील ३ वर्षात चंद्रपूर जिल्ह्यात एकूण २ उद्योग घटक बंद पडलेले आहे. चंद्रपूर जिल्ह्यात सुक्ष्म, लघु व मध्यम एकूण २७०१ उद्योग घटक कार्यरत असून त्यामध्ये रु.६९१४ कोटी गुंतवणूक झालेली असून त्यामधून चंद्रपूर जिल्ह्यात एकूण २३१८२ रोजगार निर्मिती झालेली आहे.

(२) हे खरे नाही.

याबाबत शासनास कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) शासनाने लघु उद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी योजना जाहिर केलेली असून, आजारी उद्योगांनी सर्व शासकीय देणी ६० मासिक हप्त्यांमध्ये व ७% माफक वार्षिक व्याजाने परतफेड करावयाची आहे. सदर योजनेंतर्गत ११ लघु उद्यागांना आजारी उद्योग प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुधगंगा धरणाच्या कालव्याबाबत**

**(४५) ११२०१ (०८-०४-२०१५). श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुधगंगा धरणातून (जि.कोल्हापूर) खिंडी व्हरवंडे गावानजिक व आकनूर शेजारी असलेल्या कालव्यातून एक ते दोन किमीचा कालवा खिंडी व्हरवडे, आणाजे या ठिकाणी कालवा करण्याची मागणी तेथील नागरिकांनी मा.पालकमंत्री, कोल्हापूर जिल्हा यांच्याकडे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार हा कालवा काढण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप या संदर्भात निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :**(१) अशा प्रकारचे निवेदन जलसंपदा विभागास प्राप्त झालेले नाही.

(२) मौजे खिंडी व्हरवडे व आणाजे या गावातील क्षेत्र दूधगंगा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रास येत नाही. त्यामुळे सदर लाभक्षेत्रासाठी कालवा काढण्याचे नियोजन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राधानगरी, भुदरगड, शिरोळ, चंदगड (जि. कोल्हापूर) तालुक्यातील संगणक परिचालकांनी बेमुदत ठिय्या आंदोलन सुरु केल्याबाबत**

**(४६) ११२०८ (०९-०४-२०१५). श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी, भुदरगड, शिरोळ, चंदगड तालुक्यातील संगणक परिचालकांनी आपल्यं विविध मागण्यांसाठी पंचायत समिती कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संगणक परिचालकांच्या मागण्या शासनाने त्वरित मान्य न केल्यास उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार उक्त मागण्या मान्य करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०५-२०१५) :** (१) होय.

नोव्हेंबर, २०१४ व डिसेंबर, २०१४ या महिन्यात संगणक परिचालकांनी आंदोलन केले होते.

(२) होय.

(३) व (४)

सातत्याने ३ महिने ०-२० % एवढेच उद्दीष्टपूर्ती केलेल्या संगणक परिचालकांचे करार कंपनीने डिसेंबर महिन्यात रद्द केले होते. त्यांनी जानेवारी महिन्यात उद्दीष्टपूर्ती पुर्ण करुन देण्याच्या अटीवर पुन्हा त्यांना कार्यरत करण्यात आले. तसेच दि. २६ फेब्रुवारी, २०१५ व दि. २ मार्च, २०१५ च्या शासन परिपत्रकानुसार उद्दीष्टपूर्ती पुर्ण करणा-या संगणक परिचालकांना रक्कम रु. ४५००/- इतका मोबदला देण्याचे निर्देश पंचायती राज संस्थांना देण्यात आले.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राधानगरी, गगनबावड व पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ठरणारा धामणी धरणप्रकल्प रखडला असल्याबाबत**

**(४७) ११२०९ (०९-०४-२०१५). श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी, गगनबावड व पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील डोंगराळ भागाला वरदान ठरणारा धामणी धरणप्रकल्प गेल्या २० वर्षापासून रखडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा प्रकल्प रखडण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर कारणे दूर करुन हा प्रकल्प तातडीने पूर्ण करण्यासंदर्भात शासनस्तरावरुन कोणती पावले उचलण्यत येत आहेत,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०५-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे

सदर प्रकल्पास दि. २४/१२/१९९६ रोजी मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली. तद्नंतर निविदा कार्यवाही होऊन प्रत्यक्ष कामास माहे १२/२००० मध्ये सुरुवात झालेली होती.

(२) वनजमीन व अभयारण्यातील क्षेत्र हस्तांतरण, खाजगी जमिनीचे भूसंपादन, पुनर्वसनाची अडचण तसेच अपुरा निधी या प्रमुख कारणांमुळे प्रकल्पाचे काम रखडले आहे.

(३) १. प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या १०४ हेक्टर इतक्या वनजमिनीच्या प्रस्तावास केंद्र शासनाकडून अंतिम मान्यता प्राप्त करुन घेण्यात आली आहे.

२. खाजगी जमीनीचे भूसंपादन व पुनर्वसन कार्यवाही महसूल विभागाशी समन्वयाने करण्यात येत आहे.

३. उपरोक्त बाबींच्या पूर्ततेनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरित काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातर्फे जळगांव हद्दीतून जाणाऱ्या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(४८) ११२२२ (१०-०४-२०१५). श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग क्र.६ हा दिनांक १ एप्रिल, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे वर्ग झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २० मे, २०१४ रोजी झालेल्या बैठकीतील इतिवृत्तातील नोंदीनुसार प्राधिकरणाच्या ताब्यातील या महामार्गाची देखभाल दुरुस्तीचे कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने करावीत व त्यासाठी आवश्यक निधी देण्याचे निर्देशित केले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातर्फे जळगांव हद्दीतून जाणाऱ्या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) सार्वजनिक बांधकाम विभागाने राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ च्या जळगांव जिल्ह्यातील लांबीच्या दुरुस्तीचे रुपये २.१७ कोटी एवढ्या रकमेच्या सादर केलेल्या अंदाजपत्रकास भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या सक्षम अधिकाऱ्यांने मंजूरी दिलेली असून सदर कामाकरीता रुपये १.८५ कोटी एवढे अनुदान सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आले. दुरुस्तीचे काम प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील २६ महानगरपालिकापैकी २५ महानगरपालिका क्षेत्रातील स्थानिक संस्था कर प्रणाली (एलबीटी) रद्द करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय**

**(४९) ११२५० (६-४-२०१५). श्री. ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील २६ महानगरपालिकापैकी २५ महानगरपालिका क्षेत्रातील स्थानिक संस्था कर प्रणाली (एलबीटी) रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एलबीटी रद्द केल्याने महानगरपालिकांचा आर्थिक डोलारा सांभाळण्यासाठी पंजाब-गुजरातच्या धर्तीवर व्हॅटवर २ टक्के अधिभार (सरचार्ज) लावण्याचा प्रस्ताव अर्थ विभागाने तयार करुन मा.मुख्यमंत्र्यांना सादर केला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे काय व त्याची अंमलबजावणी कधीपासून करण्यात येणार आहे वा त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-५-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) हे खरे नाही.
स्थानिक संस्था कर बंद केल्यानंतर महानगरपालिकांचे होणारे आर्थिक नुकसान कशा प्रकारे भरुन काढता येईल याबाबत शासन स्तरावर विचार विनिमय सुरु आहे. याबाबत अद्याप कोणताही अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.

---

**मुंबईतील बोरीवली येथील गोविंदनगर पोलीस चौकी गेली अनेक वर्षे बंद असल्याबाबत**

**(५०) ११२६१ (०७-०४-२०१५). श्री. ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री. सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील बोरीवली येथील एमएचबी कॉलनी, पोलीस ठाणे अस्तित्वात आल्यानंतर एक्सर पोलीस चौकीचे गोविंदनगर पोलीस चौकी असे नामकरण करण्यात आले होते, सदर पोलीस चौकी अधिकृत की अनधिकृत या वादात अडकल्याने गेली अनेक वर्षे बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस चौकी कार्यरत होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच बोरिवली परिसरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा बसावा यासाठी पश्चिम उपनगरात ३ परिमंडळे वाढविण्याचा प्रस्तावही शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रलंबित प्रस्तावावरही शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) व (२) गोविंदनगर पोलीस चौकी ही अनधिकृत आहे. सदर चौकी अधिकृत करण्याबाबत मुंबई महानगरपालिकेला परिमंडळ ११ मुंबई यांचेमार्फत प्रस्ताव पाठविलेला आहे.

(३) याबाबताचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.